विस्तार पत्रिका क्र. 13/2016

# जनावरांतील लाळया खुरकूत (फूट अँड माऊथ डीसीज) आजार



## कृषि विज्ञान केन्द्र

भाकृअनुप - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र

ओल्ड गोवा

# जनावरांतील लाळया खुरकूत (फूट अँड माऊथ डीसीज ) आजार



लक्षणे : जनावरांच्या तोंडातील फोड

लाळया खुरकूत (फूट अँड माऊथ डीसीज ) आजार जनावरांमध्ये साधारणपणे जानेवारी ते एप्रिल महिन्याच्या दरम्यान येणारा साथीचा आजार आहे. या आजारामध्ये जनावरांनां भरपूर ताप येतो, तोंडात व्रण येतात व खुरामध्ये जखमा होतात. आजाराच्या प्रभावामुळे जनावरांमध्ये बरेच दुष्परिणाम दिसतात.या आजारात दुधाळ जनावरे दूध कमी देतात. काही जनावरांत प्रजोत्पादन क्षमता घटते परिणामी ब्याच वेळा वांजपणा येते. बैलामध्ये कार्यक्षमता कमी होते. या आजारामध्ये मांसाची आणि चामड्याची प्रत कमी होवून परिणामी चामडी व मांस निर्यातीवर परिणाम होवून परदेशी व्यापारातील मिळकत कमी होण्याची शक्यता असते.

हा आजार सर्वप्रथम यूरोप मध्ये आढळला. हा आजार गाय, बैल,



लक्षणे : तोंडातील जखमा

म्हशी,वराह व शेळ्या मेंढ्यामध्ये दिसून येतो. आजाराचे प्रमाण देशी जनावरांच्या तुलनेत संकरीत जनावरांमध्ये अधिक असतो. हा आजार आपल्या देशामध्ये साधारणपणे जानेवारी ते एप्रिल महिन्यामध्ये दिसतो पण याचे प्रमाण फेब्रूवारी ते मार्च या महिन्यात सर्वाधिक असते. हा आजार साथीचा आजार असल्यामुळे रोगप्रसार झपाट्याने होवून एकाच वेळी कळपातील सर्वच जनावरांना हा आजार होवू शकतो.






## आजाराची कारणे :

लाळ्या खुरकूत (फूट अँड माऊथ डीसीज ) आजार संसर्गजन्य असल्यामुळे मुख्यता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्कामुळे ह्या आजाराचा प्रसार होतो.रोगट जनावरांचे सर्व स्त्राव ( लाळ ,शेण ,मूत्र) आजार प्रसार करण्यासाठी कारणीभूत असतात. आजारी जनावरांच्या स्त्रावामुळे दुषित झालेला चारा, पाणी यांच्या संपर्काने निरोगी जनावरांमध्ये हा आजार होतो. ह्या आजारासाठी कारणीभूत विषाणूचा हवेद्वारेपण प्रसार होतो. रोगट गोठ्यातील काम करणाऱ्या व्यक्तिद्वारे तसेच अशा गोठ्यात ये- जा करणाऱ्या, व्यक्तिद्वारे ( पशुवैद्यकीय डॉक्टर , पशू खाद्य आणणारे मजूर, वाहनाचे ड्रायवर किंवा मजूर ई. ) हा आजार होवू शकतो

## आजाराची लक्षणे :

1. पहिल्या (2-4) दिवसांत जनावरांना भरपूर ताप येतो. तापेची त्तिव्रता 104-106° फ्यारेनाईट पर्यन्त असते. त्याच्यानंतर ताप पुर्णपणे कमी होतो.
2. जनावरांच्या तोंडात, टाळूवर ,गालाच्या वा ओठाच्या आतील बाजूस अगोदर छोटी छोटी फोड येतात व नंतर असे फोड चिगळून त्या जागेत जखमा होतात व लालसर चट्टे तयार होतात.
3. तोंडातील जखमामुळे जनावरांना चारा खाणे त्रासदायक ठरतो व तोंडातून एकसारखी सतत लाळ गळत राहते.
4. जनावरांतील रवंथ करण्याची क्रिया कमी होते.
5. तोंडातील फोडाप्रमाणे दोन किंवा चारही खुरांच्या फटीमध्ये फोड येतात व नंतर ती चिगळून जखमा होतात त्यामुळे जनावरांना चालण्यास त्रास होते.
6. आजाराची तीव्रता जास्त व उपचार वेळेवर न केलेल्या जनावरांमध्ये खुरे गळून जाण्याची शक्यता असते.
7. दुधाळ जनावरांत दुग्धोत्पादन घटते.
8. जनावरे निस्तेज बनतात.
9. काही जनावरांत कासेवर फोड येवून व ती चिघळून ( स्तनदाह ) कासदाह होण्याची शक्यता असते.
10. काही गाभण जनावरांत गर्भपात होते.
11. आजाराची लागण झालेल्या जनावरांची उन्हात ( प्रखर उष्णता ) काम करण्याची क्षमता कमी होते. अशा जनावरांना प्रखर ऊन सहन होत नाही व लागलीच धापा टाकतात व थकून जातात.
12. जनावरांची त्वचा खडबडीत होते व अंगावरील केस रुक्ष बनून त्यांची लांबी वाढते.

## आजारावरील उपचारः



पॉटॅशियम परम्यागनेट

1. पॉटॅशियम परम्यागनेट (1°/ₒ) किंवा खाण्याच्या सोड्याने ( 0.5 – 1 °/ₒ ) प्रथम तोंडातील व पायातील जखमा स्वच्छ धुवून घ्यावीत व तोंडातील जखमांवर बोरोग्लिसरीन लावावे.

2. खुरांच्या जखमा धुण्यासाठी कॉपर सल्फेटचे (मोरचूद ) द्रावणपण वापरू शकतो .

3. खुरांच्या जखमा स्वच्छपणे धुल्यानंतर जखमावर जंतनाशक मलम ( लोच्याक्सिन किंवा हिम्याक्स) लावावे.

4. काही जनावरांत खुरांच्या जखमा चिगळून जर आसळ्या (आळया) असतील तर टरपेंनटाइन द्रावणामध्ये बुडवलेला कापसाचा बोळा 3–5 मिनिटे ठेवून चिमट्याच्या साह्याने आळया काढून टाकाव्यात व जंतनाशक मलम लावावे.

5. वेदनाशामक , तापनाशक, मल्टिविटामीन व प्रतीजैविकाचे औषध तज्ञ् पशूवैध्यकाच्या सल्ल्यानुसार 4– 5 दिवस सतत द्यावेत.

## आजाराचा प्रतिबंध :



लसीकरण

हा आजार विषाणूजन्य आजार असल्यामुळे प्रतीबंधात्मक लसीकरण अत्यावश्यक आहे पण जर हा आजार आलाच तर ह्या आजारावर निश्चित असा उपचार नाही व त्या साठी प्रतिबंधक उपाययोजना करणे फार गरजेचे असते जसे की ,

1. जनावरांमध्ये आजाराची लक्षणे दिसल्यानंतर लगेचच ती इतर निरोगी जनावरांपासून वेगळी बांधून उपचार चालू करावा.

2. आजाराची साथ चालू असताना बाजारातून जनावरे खरेदी किंवा विक्री करू नये.

3. जनावरांना सार्वजनिक ठिकाणी पाणी पाजू नये.

4. आपल्या कळपातील जनावरांना आजार झाल्यास ती जनावरे वेगळी बांधून गोठा 4 ०/० धुण्याच्या सोडयाने स्वच्छ धुवून घ्यावा.

5. नवीन विकत आणलेली जनांवरे कळपात न मिसळता कमीतकमी 1 महिना वेगळी बांधून लसीकरण करूनच नंतर कळपात

मिसळावी.

6. ह्या आजाराचे प्रभावशाली प्रतीबंधात्मक उपाय म्हणजे लसीकरण होय.

7. चार महिने व त्या पेक्षा अधिक वयाच्या जनावरांना प्रत्येक वर्षातून दोनदा म्हणजेच मार्च आणि सप्टेंबर महिन्यात लाळ्या खूरकूत प्रतीबंधक लस टोचून घ्यावी.

8. लसीकरण केल्यानंतर एक ते दोन आठवड्यात जनावरांत रोगप्रतिकारक शक्ति निर्माण होते व ती जवळपास सहा महिने टिकते. आता बाजारामध्ये काही लसी आहेत की ज्याची लस जनावरांत वर्षातून एकदाच द्यायची गरज असते मात्र त्याची रोगप्रतिकारक शक्ति ही वर्षभर टिकून राहते.

****


प्रकाशक :
प्रो. नरेंद्र प्रताप सिंह
निर्देशक, भाकृअनुप - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र,
ओल्ड-गोवा



*संपादक :*
श्री. एच. आर. सी. प्रभु
कार्यक्रम समन्वयक

लेखन :
डॉ. संजयकुमार विठ्ठलराव उद्धरवार
विषयतज्ञ (पशु विज्ञान)

डॉ. एकनाथ भा. चाकूरकर
मुख्य शास्त्रज्ञ (पशू विज्ञान)

डॉ. शिवशरणाप्पा नायकवडी
शास्त्रज्ञ (पशू विज्ञान)

तकनीकी सह्यायक :
श्री. विश्वजीत प्रजापती
कार्यक्रम सह्यायक (कम्प्युटर)

कृषि विज्ञान केंद्र
भाकृअनुप - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र
जुने गोवें, गोवा - 403 402
फोन : 0832-2285475
ई-मेल : pckvknorthgoa@gmail.com
वैबसाइट : www.kvkicarrcgoa.in